# प्रेस नोट

## डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजने अतर्गत वसतीगृह चालविण्यासाठी अर्ज सादर करणे बाबत

राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि. १३ जुलै २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार व शासन परिपत्रक दि.२ ऑगस्ट२०१८ अन्वये मा. मुख्यमंत्री यांनी व्हीडीओ कॉन्फरन्स व्दारे दिलेल्या सुचनेनुसार जिल्हा आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील व्यावसायीक शिक्षण घेण ा-या विद्यार्थ्यांकरीता जिल्हयाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी शासनाचे डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजने अंतर्गत वसतिगृह उपलब्ध करुन देण्याकरीता मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दि.०७ ऑगस्ट २०१८ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीत झालेल्या चर्चेनुसार शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती या संस्थेच्या परिसरात विनावापर असलेले निवास्थानाची दुरुस्ती करुन मुलींकरीता वसतिगृह सुरु करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे.

हे वसतीगृह चालविण्यासाठी नोंदणीकृत संस्थांकडुन दिना ंक १६/०८/२०१८ पर्यंत निविदा मागवुन निवड करण्यात येणार आहे.

सदर वसतिगृहामध्ये राज्यात व्यावसायीक अभ्याक्रमांमध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे प्रवेश घेणारे ज्या विद्यार्थीनींचे पालक अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजुर किंवा ज्या विद्यार्थीनींच्या पालकांचे उत्पन्न रुपये ८ लाखा पेक्षा कमी आहे अशा बिगर मागास विद्यार्थीनींना प्रवेश घेता येईल.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशीत इच्छुक विद्यार्थीनी दि. ०५/०९/२०१८ पर्यंत प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती येथे विहित नमुन्यात आवश्यक कागदपत्रासह अर्ज करावे. सदर अर्जाचा विहीत नमुना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय अमरावती यांचे वेबसाईट (www.jdroamt.org)वर उपलब्ध आहे अशी माहिती श्री अभिजीत बागंर ,जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दिली आहे.

**सदस्य सचिव तथा सहसंचालक**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती

# जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती

## डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजने अंतर्गत वसतिगृह चालविण्यासाठी अर्ज सादर करणे बाबत.

डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना अंतर्गत वसतिगृह चालविण्यासाठी शासन /स्थानिक संस्था/मंडळ यांच्या मालकीच्या इमारती नोंदणीकृत संस्थाना भाडयाने देण्याची योजना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून अंमलात आणण्यास शासनाने महाराष्ट्र शासन , उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१८/ प्र.क्र.२४९/१८/तांशि-४ दिनाकं १३ जुलै २०१८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

सदरच्या योजने ची अंमलबजावणी मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षते खाली गठित समिती मार्फत करण्यात येणार आहे. त्या साठी शासन निर्णयातील सर्वसाधारण व कार्यपध्दती व नियम यांचे अधीन राहून खालील कार्यपध्दती अनुसरण्यात येईल.

१. या योजनेखाली वसतिगृह भाडयाने देण्याकरीता इच्छूक नोंदणीकृत संस्थाकडून दिनांक १६/०८/२०१८ पर्यत अर्ज मागविण्यात येत आहेत. मागणी करणारी संस्था ही मुंबई विश्वस्त कायदा १९५० किंवा संस्था नोंदणी कायदा १८६० अंतर्गत नोंदणीकृत असावी. अशा संस्थेचे किमान ३ वर्षे लेखापरिक्षण पूर्ण असणे आवश्यक आहे.

२. जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी कार्यरत असणा-या संस्थांना प्राधान्य देण्यात येईल.

३. एकापेक्षा अनेक संस्थांची मागणी आल्यास अनुभवी व जास्त क्षमता असणा-या संस्थाना प्राधान्य देण्यात येईल.

४. वसतिगृह चालविण्यासाठी आवश्यक तो कर्मचारी वर्ग कंत्राटी तत्वावर निवड केलेल्या संस्थेने नियुक्त करणे आवश्यक राहील. या कर्मचा-यांचे कोणत्याही स्वरुपाचे दायित्व शासनावर राहणार नाही. या प्रकारचा उल्लेख करारनाम्यामध्ये करण्यात येईल.

५. वसतिगृह कामकाज व्यवस्थितरित्या चालू राहण्यासाठी जिल्हाधिकारी यांना आवश्यक वाटतील अशा अटी व शर्ती करारनाम्यामध्ये संदर्भीय शासन निर्णया अन्वये प्रदान केलेल्या शक्तीनुसार बदल करण्यास त्यांना त्यांना मुभा राहील.

६. इच्छुक संस्थानी दिनाकं १६/०८/२०१८ पर्यत आवश्यक कागदपत्रासह सिलबंद पाकीटात या कार्यालयात अर्ज सादर करावे

अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,
अमरावती.

विभाका/अम/जाहि/594/2018